# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**कोकणातील शैलस्खलनाचा (रॉकस्लाईड) चा धोका कमी करण्यासाठी तातडीने उपायोजना करण्याबाबत**

**(१) ३९३४४ (१८-०१-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील शैलस्खलनाचा (रॉकस्लाईड) चा धोका कमी करण्यासाठी शैलस्खलनाचा धोका सुमारे २०-२५ तास अगोदर मिळणारी यंत्रणा बसविण्यासाठी शासनाने माहे डिसेंबर, २०११ मध्ये वा त्यादरम्यान निविदा मागविल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू यंत्रणा किती कालावधीत व कोणकोणत्या ठिकाणी कार्यान्वित करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०८-२०१६) :**(१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापुर जिल्हयातील हातकणंगले येथे बेघर कुटूंबांसाठी मंजुर झालेल्या गावठान विस्तार योजनेतील १८७ कुटूंबांना सनद न दिल्याबाबत**

**(२) ३९७३० (२०-०४-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर जिल्हयातील हातकणंगले येथे बेघर कुटूंबांसाठी १९९१ साली मंजुर झालेल्या गावठान विस्तार योजनेतील १८७ कुटूंबांना अद्याप सनद देण्यात आलेली नसून त्या सोबत सातबारा पत्रकी मालकीचीही नोंदही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कब्जे हक्काची रक्कम चालू रेडीरेकनर नुसार भरण्याचे आदेश हातकणंगले तहसिलदार यांनी दिल्यामुळे शेतमजुर युनियन या संघटनेने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन करून जुन्या दराने कब्जे हक्काची रक्कम भरून घेण्याची उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी यांना निवेदन देवून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर १८७ कुटूंबांना सातबारा पत्रकी मालकीची नोंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०८-२०१६)** :(१) हे अंशत: खरे आहे. मौ. हातकणंगले येथील गट नं २९०/ १ पैकी ५.०६ येथे १९९१ साली मंजूर झालेल्या गावठाण विस्तार योजनेत पाडण्यात आलेल्या भूखंडाच्या सद्य:स्थितीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | भूखंडाची संख्या |
|---|---|---|
| १ | एकूण पाडण्यात आलेले भूखंड | १८६ |
| २ | वाटप करण्यात आलेले भूखंड | १६२ |
| ३ | शिल्लक भूखंड | २४ |
| ४ | मागासवर्गीयांना मोफत देण्यात आलेल्या भूखंडाची संख्या | ५४ |
| ५ | मागासवर्गीयांना वाटप केलेल्या भूखंडापैकी सनद वाटप करण्यात आलेल्या भूखंडांची संख्या | १८ |
| ६ | सनद वाटप न करण्यात आलेल्या भूखंडांची संख्या | ३८ |
| ७ | कब्जेहक्काची पूर्ण रक्कम रु. २०००/- विलंबाने भरलेले भूखंडधारक | ९१ |
| ८ | कब्जेहक्काची पूर्ण रक्कम रु. २०००/-अद्यापही न भरलेले भूखंडधारक | १४ |
| ९ | कब्जेहक्काची उर्वरित रक्कम रु. ५००/- अद्यापही न भरलेले भूखंडधारक | १ |
| १० | ग्रामपंचायतीस वाटप केलेले भूखंड | २ |

(२), (३) व (४) होय.

महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन (लाल बावटा) यांनी दि. १.२.२०१६ रोजी जिल्हाधिकारी कोल्हापूर यांना निवेदन दिले आहे. सदर निवेदनावर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पुढील प्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत.

अ) ज्या भूखंडधारकांनी विहित मुदतीत कब्जेहक्काची रक्कम न भरता विलंबाने कब्जेहक्काची रक्कम ज्या तारखेस भरली आहे. त्या तारखेस स्टेट बँक ऑफ इंडिया कडील पीएलआर प्रमाणे होणाऱ्या त्या त्या वर्षाची व्याज आकारणी करण्यात यावी.

ब) ज्या भूखंडधारकांनी कब्जेहक्कासाठी रक्कमआज अखेरपर्यंत भरली नाही. त्या भूखंडधारकांवर दिनांक २९.५.२००६ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुर्डुवाडी (जि.सोलापूर) येथे एस.टी.आगारासमोर होत असलेली अवैध वाहतूक..**

**(३) ३९७७९ (२८-०४-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्डुवाडी शहरात (जि.सोलापूर) राज्य परिवहनाच्या बसस्थानकासमोरच अवैध प्रवासी गाडया लावून प्रवाश्यांची पळवापळवी केली जाते याप्रकरणी कुर्डुवाडी आगार प्रमुखांनी पोलिसांना अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांचे क्रमांक देऊनही पोलिसांकडून कोणतीच कारवाई केली जात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याचा परिणाम एस.टी.च्या प्रवाशी संख्येवर होत असून वाहतुकीसही अडथळा निर्माण होतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील पोलिस कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१२-०९-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) अवैध प्रवासी वाहतूकीस आळा घालण्याकरीता शासनाने दि.१४.०१.२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये संबंधित अधिकारी अवैध वाहतूकदारांवर कारवाई करीत नसल्याचे आढळल्यास, अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशा सूचना निर्गमित केल्या आहेत.
अवैध प्रवासी वाहतुक करणाऱ्या वाहनांची क्रमांकासहीत यादी राज्य परिवहन कुडुंवाडी आगार व्यवस्थापक यांनी पोलीस स्टेशन कुर्डुवाडी यांना देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने कुडुंवाडी पोलीस स्टेशन व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, अकलुज यांचेकडून अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात शासनाच्या जाचक अटींमुळे १० हजार शेतकरी आंबा नुकसान भरपाई पासून वंचित राहणार असल्याबाबत**

**(४) ४००८४ (२८-०४-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात शासनाच्या जाचक अटींमुळे १० हजार शेतकरी आंबा नुकसान भरपाई पासून वंचित राहणार असल्याचे माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती या जाचक अटी रद्द करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१०-२०१६)** :(१) हे खरे नाही.

केंद्र शासनाने निश्चित केलेल्या निकष व दरांनुसार दि.१३ मे, २०१५ च्या शासन निर्णयान्वये शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ शहरात असलेल्या एस.टी. महामंडळाच्या बस स्थानकाची झालेली दुरवस्था**

**(५) ४०३२९ (२०-०४-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ शहरात असलेल्या एस.टी. महामंडळाच्या बस स्थानकाची दुरवस्था झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बस स्थानकातील रस्ते, बैठक व्यवस्था, प्रसाधनगृह व स्वच्छतेचा अभाव आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, बस आगाराची तातडीने डागडुजी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०८-२०१६)** :(१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) बसस्थानकाच्या आवारातील डागडुजी करण्यात येवून आऊटगेट जवळ पडलेला खड्डा बुजवण्यात आला आहे. तसेच बसस्थानकाच्या प्रतिक्षालयातील आसन व्यवस्था दुरुस्त करण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

आगार व्यवस्थापकास आगाराच्या देखरेखीखाली बसस्थानक व प्रसाधनगृहाची दैनंदिन साफसफाई करुन घेण्याबाबत राज्य परिवहन महामंडळाद्वारे सूचना देण्यात आलेल्या आहेत. प्रसाधनगृहाच्या व बसस्थानकाच्या दैनंदिन साफ सफाईबाबत प्रसाधनगृहाच्या चालकास वेळोवळी सूचना देण्यात येवून दंडाची आकारणी सुध्दा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा-अहमदनगर मतदार संघ दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करणेबाबत**

**(६) ४०५२६ (२०-०४-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा-अहमदनगर विधानसभा मतदार संघात पाऊस अतिअल्प झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असल्यामुळे हा मतदार संघ दुष्काळग्रस्त म्हणून जाहिर करण्यात यावा अशी मागणी तेथील लोकप्रतिनिधीनी दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केंद्रीय दुष्काळ निवारण समितीकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीगोंदा-अहमदनगर या मतदार संघात दुष्काळ जाहिर करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) शासन निर्णय दिनांक २७ एप्रिल, २०१६ व ११ मे २०१६ अन्वये सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामातील अंतीम पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी असलेल्या गावांमध्ये विविध उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. या निर्णयान्वये अहमदनगर जिल्ह्यातील ९५३ गांवामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहिर करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यात रब्बी हंगामातील पिके पावसाअभावी व कुकडी धरणाचे पाणी शेतकऱ्यांना मिळाले नसल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले नुकसान**

**(७) ४०५३९ (०५-०५-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा तालुक्यात रब्बी हंगामातील पिके पावसाअभावी व कुकडी धरणाचे पाणी शेतकऱ्यांना मिळाले नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झालेले असतांना शासनाच्या आडमुठे धोरणामुळे ११५ महसूल गावांपैकी ७१ गावांची पैसेवारी ५२ पैसे पेक्षा अधिक काढण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) श्रीगोंदा तालुक्यात सतत दोन वर्षे दुष्काळ असताना कुकडी धरणाचे पाणी सुटूनही त्याचा लाभ शेतकऱ्याला मिळाले नसताना आणेवारी ५२ पैशापेक्षा अधिक काढल्यामुळे तेथील शेतकरी अडचणीत सापडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार आणेवारी पुन्हा काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे. श्रीगोंदा तालुका हा रब्बी तालुका असून या तालुक्यात ११५ गावे आहेत. श्रीगोंदा तालुक्यातील दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी जाहिर करण्यात आलेल्या नजर पैसेवारी नुसार तालुक्यातील ११५ गावांपैकी ४० गावांची पैसेवारी ५० पैसेपेक्षा कमी होती तर उर्वरित ७५ गावांची पैसेवारी ही ५० पैशापेक्षा जास्त होती.
(२) हे खरे नाही. श्रीगोंदा तालुक्याची सुधारीत पैसेवारी दिनांक ३१/०१/२०१६ रोजी तर अंतीम पैसेवारी दिनांक १५ मार्च, २०१६ जाहिर करण्यात आलेली असून तालुक्यातील सर्व ११५ गावांची पैसेवारी ५० पैसेपेक्षा कमी आलेली आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शाळेतील विद्यार्थी, अपंग व ज्येष्ठ नागरिकांना**
**एसटीच्या प्रवास भाडयात सवलत मिळण्याबाबत**

**(८) ४१८६५ (२८-०४-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळेतील विद्यार्थी, अपंग व ज्येष्ठ नागरिकांना एसटीच्या प्रवासात भाडयात सवलत मिळते, याबद्दल एसटी महामंडळाला पाचशे कोटी रुपये राज्य शासनाकडून देण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी आतापर्यंत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) असल्यास, निर्णयाअंती राज्य शासनाकडे एसटीमहामंडळाची थकीत रक्कम त्वरीत उपलब्ध करुन देऊन एसटी महामंडळाची सेवा अधिक चांगल्या दर्जाच्या करण्यासंदर्भात पाठपुरावा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-१०-२०१६) :**(१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळामार्फत विविध प्रवाशीवर्गासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रवास सवलत योजनांची प्रतिपूर्ती राज्य शासनामार्फत करण्यात येते. त्यानुसार सन २०१५-१६ मध्ये रु.१३३८.१५ कोटी एवढा निधी राज्य परिवहन महामंडळास वितरीत करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सन २०१६-१७ आर्थिक वर्षासाठी रु.१११२.८२ कोटी एवढी तरतूद या योजनांसाठी अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

तसेच एसटी महामंडळाची सेवा अधिक चांगल्या दर्जाची करण्याकरीता हिरकणी सेवेत पुश बॅक सीट सुविधा, नवीन वातानुकूलित शिवनेरी बसेसची खरेदी, सक्षम मार्ग तपासणी व अवैध वाहतुकीद्वारे उत्पन्न गळती रोखणे, प्रवासी आकर्षित करण्यासाठी समाजातील २४ विविध घटकांना ५० ते १०० टक्केपर्यंत प्रवास भाड्यात सवलत, वार्षिक सवलत कार्ड, मासिक/त्रैमासिक कार्ड योजनांना व्यापक प्रसिध्दी देऊन प्रवासी व उत्पन्न वाढीसाठी

उपाययोजना करण्यात येत आहे. तसेच प्रवाशांच्या सोईकरीता मोबाईल ॲप तयार करण्यात आला असून, इ-तिकीटाद्वारे आरक्षण सुविधा, स्मार्ट कार्ड सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच, रा.प. बसेसवर जीपीएस, व्हीटीएस, सीसीटीव्ही, वायफाय, पॅसेंजर्स इनफॉरमेशन सिस्टीम या राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महामंडळाच्या बससेवेत अत्याधुनिक बसेसचा समावेश करण्याबाबत**

**(९) ४२०४५ (२८-०४-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जुनाट बसेस, तांत्रिक बिघाड व अपुरे मनुष्यबळ इ.कारणामुळे एस.टी.बसेसच्या अपघातांमध्ये गत पाच वर्षामध्ये २ हजार ५५३ प्रवाशांचा बळी गेल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आह काय,
(२) असल्यास, रस्ते अपघात नियंत्रणात आणण्यासोबतच महामंडळाच्या बससेवेत अत्याधुनिक बसेसचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०८-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

गत पाच वर्षात राज्य परिवहन बसेसच्या अपघातात एकूण २५८९ जण मृत झाले असून सदर अपघातास जुनाट बसेस, यांत्रिक बिघाड व अपुरे मनुष्यबळ हीच कारणे कारणीभूत नसून इतर वाहन चालकांची चूक व पादचाऱ्यांच्या चुकांचाही यामध्ये समावेश आहे.
(२) रा.प. महामंडळाच्या सेवेत अत्याधुनिक व्होल्वो बसेस, स्कॅनिया, पुश बॅक निमआराम बसेस (हिरकणी) इ. दाखल करण्यात आलेल्या आहेत. तसेच भाडे तत्वावर ५०० वातानुकूलित आसनी / शयनयान बसेस घेण्याबाबत निविदा कार्यवाही अंती कार्यादेश देण्यात आला आहे.

एस.टी.प्रवास सुरक्षित व्हावा याकरिता महामंडळातर्फे खालील उपाय योजना करण्यात येत आहेत.

महामंडळात नव्याने भरती झालेल्या चालकांना ४८ दिवसांचे सेवापुर्व प्रशिक्षण देण्यात येते. तसेच रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी पुणे येथे अपघात प्रवण चालकांना ७ दिवसाचे निवासी प्रशिक्षण देण्यात येते. त्याचप्रमाणे चालकाकडून अपघात झाल्यास विभागीय स्तरावर १० दिवसांचे अपघात प्रवण पाठ्यक्रम प्रशिक्षण दिले जाते.

मे.वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल्स असोसिएशनतर्फे दिनांक ०१.०२.२०१४ पासून एक दिवसाचे सिम्युलेटर प्रशिक्षण देण्यात येते.

चालकांसाठी प्रत्येक विभागामध्ये चालकांच्या सकारात्मक मानसिकतेकरिता तज्ञ समुपदेशकाची नियुक्ती करण्यात येऊन त्याचेद्वारे समुपदेशन केले जात आहे.

प्रजापिता ब्रम्हकुमारी विश्वविद्यालयाच्या प्रशिक्षकामार्फत प्रशिक्षण शिबिरे आगार पातळीवर आयोजित करुन चालकांना त्यांचेकडून मार्गदर्शन करुन प्रबोधन केले जाते.

दि.०१.१०.२०१५ पासून उत्पादित होणाऱ्या प्रत्येक चासीसवर ॲन्टी ब्रेक सिस्टिम व स्पिड लिमिटींग डिव्हाईस बसविणे बंधनकारक आहे व त्याप्रमाणे नविन गाड्या महामंडळाच्या चालणात आणण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

सद्यस्थितीत ३२ नविन व्होल्वो बसेस व २३ स्कॅनिया बसेस महामंडळाच्या वाहन ताफ्यात नव्याने दाखल झाल्या असून आणखी १३ स्कॅनिया बसेस लवकरच वाहन ताफ्यात दाखल होणार आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरपूर उपनगरात बससेवा सुरु करण्याबाबत**

**(१०) ४२२५३ (२८-०४-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येणाऱ्या सर्वसामान्य भाविकांसह स्थानिक व ग्रामीण भागातील नागरिकांच्या सोईसाठी राज्य परिवहन महामंडळाने तीन वर्षापुर्वी लगतच्या गावांकडे बस उपनगरातील रस्त्यांवरुन सोडण्यात आल्या होत्या परंतु सध्या सदरील बससेवा बंद असल्याने नागरिकांचे मोठया प्रमाणात गैरसोय होत् असल्याचे माहे जाने २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही बससेवा पुन्हा सुरु करण्यात यावी अशी सर्वसामान्य भाविकांसह स्थानिक व ग्रामीण भागातील नागरिकांची मागणी होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंढरपूर उपनगरात बससेवा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१२-०८-२०१६) :**(१), (२) व (३) दि. १३.०८.२००९ पासून पंढरपूर शहराच्या उपनगरातील मार्गावर प्रायोगिक तत्वावर शहर वाहतूक बस सेवा सुरु करण्यात आली होती. सदर सेवेस माहे ऑगस्ट २००९ ते एप्रिल, २०१० या कालावधीत मिडी बसचे सरासरी भारमान ५१ एवढे मिळाले होते. त्यामुळे सदर सेवेत मिळालेला कमी प्रवाशी प्रतिसाद व भारमान लक्षात घेवून सदर सेवा बंद करण्यात आली. तदनंतर नागरिकांद्वारे केलेल्या निवेदनानुसार पंढरपूर स्थानकावरुन कासेगांव, गादेगांव, भंडीशेगांव, गोपाळपूर, वाखरी, आढीव, देगांव, नारायण चिंचोली, गुरसाळे व तुंगत या परिसरात चारही बाजूस उपनगर मार्गावर दर १५ ते ३० मिनिटाला राज्य परिवहन बससेवा सुरु करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील माढा व परिसरातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(११) ४२४७४ (२८-०४-२०१६). श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील माढा व परिसरात रब्बी हंगामातील अल्पशा पावसामुळे ज्वारीचे पीक बाटुक झाले आहे तर काही ठिकाणी वितभर येऊन जळून गेले असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्वारीही नाही आणि पुरते वैरणसुध्दा नसल्याने शेतकऱ्यांनी बाटूक काढून घेण्यास सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक एससीवाय-२०१६/प्र.क्र.२१९/म-७, दि.२७ एप्रिल, २०१६ अन्वये सोलापूर जिल्हयातील १०३८ गावांची रब्बी हंगामातील अंतिम पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी असलेल्या गावांमध्ये दुष्काळ जाहीर करुन त्यानुषंगाने विविध उपाययोजना जाहीर केलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील धोम कन्हेर या विभागातील गावांना सुविधा मिळण्याबाबत**

**(१२) ४३१२२ (२८-०४-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धोम कन्हेर (जि.सातारा) या गावांतील पुनर्वसन २५ वर्षापासून झाले असताना तेथील जनतेला १८ नागरी सुविधा अद्यापही मिळालेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांना सुविधा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०८-२०१६)** :(१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सातारा जिल्ह्यातील धोम व कण्हेर प्रकल्पाने बाधित पुर्नवसित गावांमध्ये देय मुलभूत नागरी सुविधांपैकी ३३१ सुविधा पुरविण्यात आल्या असून, उर्वरित देय नागरी सुविधा पुरविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दिघी कोल्हे (ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती) येथील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचा मेबदला तातडीने देण्याबाबत**

**(१३) ४३२४० (२८-०४-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिघी कोल्हे (ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी रायगड नदी प्रकल्पामध्ये गेलेल्या शेतजमिनीचा मेबदला तातडीने देण्याबाबतचे निवेदन अधिक्षक अभियंता, अमरावती पाटबंधारे मंडळ, अमरावती यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी करुन त्यांना योग्य मोबदला देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०८-२०१६)** :(१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प अमरावती यांचेकडून रायगड नदी प्रकल्पांतर्गत मौजा दिघी कोल्हे भूसं.प्र.क्र. ३०/४७/२०१४-१५ या प्रकरणामध्ये भूसंपादन प्रकरणी मोबदला देण्याकरिता रुपये ११२०२४५६२/- इतक्या रुपयाचा निधी दि. ८.१२.२०१५ रोजी प्राप्त झाला आहे. सदर प्रकरणात कलम २१(१)(४) अंतर्गत चौकशी सुरु आहे. तदनंतर प्रारुप निवाडा तयार करुन अंतिम निवाडा घोषित करण्यात येवून संबंधित भूधारकांना जमिन मोबदला वाटप करण्याची दक्षता जिल्हाधिकारी, अमरावती कार्यालयाकडून घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली-कोल्हापूर रस्त्याचे काम तीन वर्षे सुरु असल्याने रस्त्यावरील धुळीमुळे पिकाचे होत असलेले नुकसान**

**(१४) ४३५१२ (२८-०४-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली-कोल्हापूर रस्त्याचे काम तीन वर्षापासून सुरु असल्याने धुळीकणामुळे शेती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनामार्फत पिकांची पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीअंती नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०९-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(१५) ४४२७१ (२८-०४-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी तसेच टंचाई निवारण्याच्या विविध उपाययोजनांसाठी केंद्र शासनाने ३५७८ कोटी रुपये निधी, महाराष्ट्र शासनाला देण्याचा निर्णय दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेतला, हे खरेआहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनास दुष्काळ व टंचाई निवारण करण्यासाठी एकूण किती निधीची आवश्यकता आहे, केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिलेला निधी विचारात घेता, उर्वरित निधी तातडीने उपलब्ध करुन देण्यासाठी शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) असल्यास, राज्यातील दुष्काळ व टंचाई निवारणासाठी राज्य शासनातर्फे उपलब्ध निधीपैकी प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध करुन दिला आहे, त्याची जिल्हानिहाय स्थिती काय आहे व अद्‌याप किती निधी उपलब्ध करुन देणे बाकी आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०८-२०१६)** :(१) हे खरे आहे.
(२) आवश्यक तेवढा सर्व निधी मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आली होती. केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी व त्यामध्ये आवश्यक उर्वरित विभागीय आयुक्त यांच्या मागणीप्रमाणे वाटप करण्यात आला आहे.

(३) जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे :-

| खरीप -२०१५ हंगामाकरिता वितरीत निधीचे विवरणपत्र (रुपये कोटीत) | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | आवश्यक निधी | आतापर्यत वितरीत करण्यात आलेला निधी | शिल्लक निधी |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| नाशिक विभाग | | | | |
| १ | नाशिक | ३३१.१२ | १८५.१ | १४६.०२ |
| २ | धुळे | १२६.५४ | १००.३४ | २६.२ |
| ३ | नंदुरबार | ५४.७७ | ४५.७४ | ९.०३ |
| ४ | जळगाव | १८८.३२ | १४६.८ | ४१.५२ |
| ५ | अहमदनगर | १६७.६ | १३०.६५ | ३६.९५ |
| | एकूण | ८६८.३५ | ६०८.६३ | २५९.७२ |
| पुणे विभाग | | | | |
| ६ | पुणे | ३०.७८ | २४.२१ | ६.५७ |
| ७ | सातारा | ११४.६२ | ८९.३५ | २५.२७ |
| ८ | सांगली | १२५.०७ | १२५.०७ | ० |
| | एकूण | २७०.४७ | २३८.६३ | ३१.८४ |
| औरंगाबाद विभाग | | | | |
| ९ | औरंगाबाद | १९१.९१ | १८२.७ | ९.२१ |
| १० | जालना | २२१.४७ | २२१.४७ | ० |
| ११ | बीड | २३५.०७ | २३५.०७ | ० |
| १२ | लातूर | ३७६.२८ | ३०३.१४ | ७३.१४ |
| १३ | उस्मानाबाद | ३२८.८९ | २५६.३७ | ७२.५२ |
| १४ | नांदेड | ३१४.६८ | ३१४.६८ | ० |
| १५ | परभणी | १९९.८ | १८५.७५ | १४.५ |
| १६ | हिंगोली | २०१.१७ | १९४.३९ | ६.७८ |
| | एकूण | २०६९.२७ | १८९३.५७ | १७५.७ |
| अमरावती विभाग | | | | |
| १७ | बुलढाणा | ३२८.८५ | ३२८.८५ | ० |
| १८ | अकोला | १२.८७ | १२.८७ | ० |
| १९ | यवतमाळ | ०.०९ | ०.०५ | ०.०४ |
| | एकूण | ३४१.८१ | ३४१.७७ | ०.०४ |
| नागपूर विभाग | | | | |
| २० | नागपूर | २.८५ | २.८५ | ० |
| २१ | गडचिरोली | २५.६८ | २५.६८ | ० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | एकूण | २८.५३ | २८.५३ | ० |
| | एकूण सर्व | ३५७८.४३ | ३१११.१३ | ४६७.३ |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयामधील अलिबाग, कर्जत, महाड, माणगाव बस स्थानकांकडे झालेले दुर्लक्ष**

**(१६) ४४६३१ (२८-०४-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील १३ बस स्थानकांच्या आधुनिकीकरणासाठी शासनाने १८०० कोटी निधी मंजूर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्मार्ट स्थानकांचे रायगड जिल्हयातील एकमेव पनवेल बस स्थानकाचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वाधिक उत्पन्न देणाऱ्या रायगड जिल्हयामधील अलिबाग, कर्जत, महाड, माणगाव स्थानकांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (३) मधील स्थानके स्मार्ट स्थानकात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०८-२०१६) :**(१) नाही.

महाराष्ट्रातील १३ बसस्थानके सार्वजनिक खाजगी सहभागातून (PPP) आधुनिक बस तळ म्हणून विकसित करण्यात येणार आहेत.

(२) पनवेल येथील बसस्थानकाचा समावेश १३ ठिकाणच्या प्रस्तावित "आधुनिक बस तळ" मध्ये करण्यात आलेला आहे.

(३) व (४) रायगड विभागातील महाड येथील बसस्थानकांचे शासननिधीतून आधुनिकीकरण करण्याची तसेच अलिबाग, कर्जत व माणगांव येथील स्थानकांची निधीच्या उपलब्धतेनुसार नुतनीकरणाची कामे करण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महिला सरपंचाना मोफत एस.टी प्रवास पासची**
**अंमलबजावणी तातडीने करण्याबाबत**

**(१७) ४४७०४ (२८-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिला सरपंचाना मोफत एस.टी प्रवास पासची सन २००९ साली घोषणा शासनाने केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यांची अंमलबजावणी अद्यापही न झाल्याने कोल्हापूर जिल्ह्यातील साडेचारशे महिला सरपंच मोफत एस.टी प्रवास योजनेच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेचे अंमलबजावणी तातडीने करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२७-०९-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाद्वारा देण्यात येणाऱ्या सवलत मूल्याची प्रतिपूर्ती संबंधित विभागाद्वारा देण्याबाबत दि.१०.०२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता. तथापि, संबंधित प्रशासकीय विभागाद्वारा राज्य परिवहन महामंडळास सवलत मूल्याच्या प्रतिपूर्तीची रक्कम प्राप्त न झाल्याने सर्व सवलत मूल्याच्या प्रतिपूर्तीचे दायित्व गृह (परिवहन) विभागाकडे देण्याबाबत दि.२५.०२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे उक्त सवलत मूल्याच्या प्रतिपूर्तीकरीता सर्व सवलत योजनांचा आढावा घेण्यासाठी दि.०३.०५.२०१६ च्या शासन निर्णयान्वये उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर यासंदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पीक पैसेवारी पध्दतीबाबत सर्व समावेशक शासन निर्णयाच्या अनुषंगाने अमरावती जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करण्याबाबत

**(१८) ४५०१६ (२०-०४-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ३ नोव्हेंबर, २०१५ च्या पीक पैसेवारी पध्दतीबाबत सर्व समावेशक शासन निर्णयाच्या अनुषंगाने अमरावती जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करण्याबाबत विसस अचलपूर यांनी माहे २७ नोव्हेबर, २०१५ रोजी मा.महसूल मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील पावसाची कमतरता, अनियमित वीज पुरवठा, पाणी असूनही न झालेले सिंचन यामुळे जिल्ह्यातील पिकांची पैसेवारी ३३ वर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करण्याबाबत या आगोदर ही जिल्हाधिकारी यांनी आश्वासन देऊनही दुष्काळग्रस्त यादीत जिल्हा आला नाही हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अमरावती जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) शासन निर्णय दिनांक २३ मार्च, २०१६ व दिनांक ११ मे २०१६ अन्वये अमरावती जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळामार्फत विविध घटकांना**
**२४ प्रकारच्या सवलती प्रवाशांना देण्याबाबत**

**(१९) ४५१३७ (२८-०४-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळामार्फत विविध घटकांना २४ प्रकारच्या सवलती प्रवाशांना देण्यात येतात, मात्र या सवलती पोटी सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षात २८०० कोटी रुपयांची थकबाकी शासनाकडे थकीत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे हे खरे काय,
(२) असल्यास, उक्त थकबाकी मुळे एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती दयनीय झाली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन मंडळाला पूर्ण थकबाकी कधी पर्यंत देणार,
(४) त्याचे थोडक्यात स्वरुप काय ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०८-२०१६) :**(१), (२), (३) व (४) सवलत मुल्यापोटी राज्य शासनाकडून महामंडळास सन २०१४-१५ चे रु. १२१७.२५ कोटी व सन २०१५-१६ साठी रु. १३५१.४५ कोटी असे एकूण रु. २५६८.७० कोटी देणे प्रलंबित असून त्यापैकी सन २०१५-१६ मध्ये रु.१२१३.८२ कोटी सवलत मूल्य राज्य परिवहन महामंडळाला उपलब्ध करुन दिले आहेत.

---

**मुरमाडी/तुप (ता.लाखनी, जि.भंडारा) येथील शेतकऱ्यांच्या जमीनीला योग्य मोबदला देण्याबाबत**

**(२०) ४५१५७ (२८-०४-२०१६). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसेखुर्द प्रकल्पाचा डाव्या कालव्यात संपादीत केलेल्या जमीनीला योग्य मोबदला मिळाला नसल्यामुळे ग्राम मुरमाडी/तुप, (ता.लाखनी, जि.भंडारा) येथील काही प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी असूनही मोबदला स्वीकारला नसून योग्य मोबदला मिळाल्याशिवास अधिग्रहणास तयार होणार नसल्याचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनात मुरमाडी/तुप गावालगत असलेल्या ग्राम झरप/कोलारा या गावातील शेतकऱ्यांना जमीन अधिग्रहणानुसार मोबदला मिळत असल्याचे नमुद आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा प्रशासनाने चौकशी करुन मुरमाडी/तुप येथील शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) योग्य दराने मोबदला देण्यात आलेला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील खत, किटकनाशक, उत्पादन विक्रेत्यांना दोन वर्षातच कृषिची पदवी घेण्याबाबत**

**(२१) ४६२९३ (२८-०४-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खत, किटकनाशक, उत्पादन विक्रेत्यांना दोन वर्षातच कृषिची पदवी घ्यावी, असे आदेश माहे जानेवारी, २०१६ च्या सुमारास कृषि संचालकांनी काढले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतेक कृषि विद्यापीठात पदवी अभ्यासक्रम हा तीन ते चार वर्षाचा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तीन वर्षाचा अभ्यासक्रम दोन वर्षात कशा प्रकारे पूर्ण करण्याविषयी कृषि संचालकांनी काही नियोजन केले आहे काय,

(४) तसेच बहुतांश विक्रेत्यांचे वय झाले असून त्यांच्याकरिता काही सवलत शासन देणार आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२९-०७-२०१६) :**(१) रासायनिक खते व किटकनाशकासंदर्भात केंद्र शासनास निर्गमित केलेल्या दि. १०.१०.२०१५ व दिनांक ५/११/२०१५ रोजीच्या अधिसुचनांमधील तरतुदीचे पालन करण्याबाबत संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण) यांनी दि. ८.१२.२०१५ च्या पत्रान्वये संबंधित सर्व अधिकाऱ्यांना निर्देश दिलेले आहेत, हे खरे आहे.

(२) होय.

(३) केंद्र शासनाच्या अधिसूचनेत विहीत केलेली शैक्षणिक पात्रता परवानाधारकांसाठी / त्याने नेमणुक करावयाच्या व्यक्तीसाठी लागू असल्याने कृषी संचालकांनी त्यासाठी नियोजन करण्याची आवश्यकता नाही.

(४) व (५) वरील अधिसूचना केंद्र शासनाची असल्याने राज्य शासनाने, विद्यमान असलेल्या किटकनाशके परवाना धारकांसाठी लागू केलेल्या शैक्षणिक अर्हतेबाबत पुनर्विचार करुन अशा परिवानाधारकांसाठी अधिसूचनेप्रमाणे विहीत करण्यात आलेल्या शैक्षणिक अर्हतेऐवजी २ ते ३ महिन्याच्या अल्पकालीन अभ्यासक्रमाची अट घालण्याची विनंती केंद्र शासनाला दि. ११.०१.२०१६ रोजी करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सन २००४-०५ या कालावधीसाठी आलेल्या निधीतील २ कोटी ८१ लक्ष रुपये शासनाकडे परत गेल्याबाबत

**(२२) ४६५३३ (२८-०४-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयात झालेल्या नैसर्गिक आपत्तीतील शेतकऱ्यांना शासनाकडून सन २००४-०५ या कालावधीसाठी आलेल्या निधीतील २ कोटी ८१ लक्ष रुपये शासनाकडून परत गेला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसान भरपाई मिळण्यासाठी असलेल्या जाचक अटींची पुर्तता शेतकऱ्यांकडून न झाल्यामुळे निधी परत गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०८-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथील शेतकऱ्यांना**
**ठिबक व स्पिंकलरचे अनुदान मिळण्याबाबत**

**(२३) ४६६०० (२१-०४-२०१६). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर मतदार संघातील अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथील शेतकऱ्यांचे १.७५ कोटी, व दर्यापूर येथील ६५ लक्ष रुपयांचे ठिबक व स्पिंकलरचे अनुदान बाकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना ठिबक व स्पिंकलरचे अनुदान मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०१-१०-२०१६) :**(१) व (२) शेतकऱ्यांकडून सूक्ष्म सिंचनाचे अर्ज ऑनलाईन स्वीकारण्यात येतात. उपलब्ध निधीच्या मर्यादेत प्राथम्य-क्रमानुसार अर्जांना पूर्वसंमती देण्यात येते. पूर्वसंमती दिलेल्या ज्या अर्जदार शेतकऱ्यांनी सूक्ष्म सिंचन संच बसवून अनुदानासाठी प्रस्ताव सादर केले आहेत, असेच शेतकरी अनुदानासाठी पात्र ठरतात. अमरावती जिल्ह्यातील पूर्वसंमती दिलेले कोणतेही अर्ज प्रलंबित नाहीत. ज्या शेतकऱ्यांनी पूर्वसंमती नसताना सूक्ष्म सिंचन संच बसविले आहेत, असे अर्जदार शेतकरी अनुदानासाठी पात्र ठरत नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संत्रा पुर्नजीवन योजनेमध्ये शेतकऱ्यांची खर्च झालेली रक्कम ७० लक्ष अनुदान मिळण्याबाबत**

**(२४) ४६६०२ (२८-०४-२०१६). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर मतदारसंघातील अंजनगाव सुर्जी तालुक्यातील संत्रा पुर्नजीवन योजने अंतर्गत कृषि अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे संत्रा पुर्नजीवन योजना यशस्वीरित्या राबविली परंतु शासनाकडे एकुण ७० लक्ष रुपये अनुदान शेतकऱ्यांना मिळणे बाकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळग्रस्त परिस्थितीत सुध्दा संत्रा पुर्नजीवन योजनेमध्ये शेतकऱ्यांची खर्च झालेली रक्कम ७० लक्ष अनुदान मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१९-०८-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

अंजनगाव सुर्जी तालुक्यात संत्रा पुनरुज्जीवन योजना यशस्वीरित्या राबविली, हे खरे आहे, मात्र शासनाकडे एकूण ७० लक्ष रुपये अनुदान शेतकऱ्यांना मिळणे बाकी आहे, हे खरे नाही.

(२) अंजनगाव सुर्जी तालुक्यास, सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेमधून "दुष्काळसदृष्य परिस्थितीत बहुवार्षिक फळपिके वाचविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना" या करीता रु. ५७.७० लाख व सन २०१५-१६ मध्ये एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानामधून "फळबागांचे पुनरुज्जीवन" या घटकांतर्गत रु. ५.७० लाख, असा एकूण रु. ६३.४० लाख इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्हयात सुरक्षितपणे वाहन चालविण्याकरिता वाहन चालकांना विशेष प्रशिक्षण देण्याबाबत

**(२५) ४६६७२ (२८-०४-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयात गेल्या वर्षभरात एसटी बसचे २३७ अपघात झाले असून त्यात १७ निष्पाप नागरिकांचा बळी तर १३९ प्रवासी जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याकरिता भरपाईपोटी तब्बल दोन कोटी रुपये मदत द्यावी लागली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुरक्षितपणे वाहन चालविण्याकरिता वाहन चालकांना विशेष प्रशिक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०८-२०१६) :**(१) होय.

नाशिक जिल्हयात दि.०१ एप्रिल, २०१५ ते ३१ मार्च, २०१६ या कालावधीत एस.टी. बसचे १६६ अपघात झाले असून त्यामध्ये १७ व्यक्ती मयत झाल्या आहेत व १८९ प्रवाशी जखमी झाले आहेत.
(२) एकूण रु.२,९३,१५,९४३/- एवढी नुकसान भरपाई देण्यात आली आहे.
(३) एस.टी.प्रवास सुरक्षित व्हावा याकरिता महामंडळातर्फे खालील उपाय योजना करण्यात येत आहेत.

महामंडळात नव्याने भरती झालेल्या चालकांना ४८ दिवसांचे सेवापुर्व प्रशिक्षण देण्यात येते. तसेच रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी पुणे येथे अपघात प्रवण चालकांना ७ दिवसाचे निवासी प्रशिक्षण देण्यात येते. त्याचप्रमाणे चालकाकडून अपघात झाल्यास विभागीय स्तरावर १० दिवसांचे अपघात प्रवण पाठ्यक्रम प्रशिक्षण दिले जाते.

मे.वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल्स असोसिएशनतर्फे दिनांक ०१.०२.२०१४ पासून एक दिवसाचे सिम्युलेटर प्रशिक्षण देण्यात येते.

चालकांसाठी प्रत्येक विभागामध्ये चालकांच्या सकारात्मक मानसिकतेकरिता तज्ञ समुपदेशकाची नियुक्ती करण्यात येऊन त्याचेद्वारे समुपदेशन केले जात आहे.

प्रजापिता ब्रम्हकुमारी विश्वविद्यालयाच्या प्रशिक्षकामार्फत प्रशिक्षण शिबिरे आगार पतळीवर आयोजित करुन चालकांना त्यांचेकडून मार्गदर्शन करुन प्रबोधन केले जाते.

दि.०१.१०.२०१५ पासून उत्पादित होणाऱ्या प्रत्येक चासीसवर ॲन्टी ब्रेक सिस्टिम व स्पिड लिमिटींग डिव्हाईस बसविणे बंधनकारक आहे व त्याप्रमाणे नविन गाड्या महामंडळाच्या चालणात आणण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणातील विशेषत: दापोली येथील सन २०१२-२०१३ मधील आंबा नुकसानीची रक्कम शेतकऱ्यांना डिसेंबर २०१५ अखेरपर्यंत न मिळाल्याबाबत**

**(२६) ४६९९४ (२८-०४-२०१६). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील विशेषतः दापोली येथील सन २०१२-२०१३ मधील आंबा नुकसानीची रक्कम अद्याप शेतकऱ्यांना मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत तातडीने देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

दापोली तालुक्यामध्ये सन २०१२-१३ ची आंबा नुकसानीची माहिती निरंक आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील शेतक-यांना ठिबक व तुषार योजनेचा लाभ मिळत नसल्याबाबत**

**(२७) ४७०५७ (२८-०४-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील शेतक-यांनी ठिबक सिंचन व तुषार अनुदानासाठी ६८६३ शेतक-यांनी प्रस्ताव सादर केलेले असून बरेच शेतकरी ऑनलाईन प्रस्ताव भरता येत नसल्याने व ऑनलाईन सेवा खंडीत होत असल्याने व ६८६३ प्रस्ताव शेतक-यांनी दाखल करुनही अदयाप त्यांना लाभ मिळाला नसल्याचे खरे आहे काय,

(२) असल्यास,शेतक-यांना ठिबक व तुषार सिंचनाचे लाभ केव्हा मिळणार त्याबाबत जिल्हा कृषी अधिकारी यांनी काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२०-०९-२०१६)** :(१) व (२) सन २०१५-१६ मध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचाई केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन संचासाठी अर्ज करण्यासाठी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ ते १५ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत ई-ठिबक प्रणाली सुरु ठेवण्यात आली होती. ई-ठिबक आज्ञावलीद्वारे नांदेड जिल्हयातील ६८६३ अर्ज ऑनलाईन प्राप्त झाले. त्यापैकी ५६२४ अर्ज पात्र ठरले. उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत ३५६४ अर्जांना पूर्वसंमती देण्यात आली. आजअखेर पूर्वसंमती दिलेल्या २३२१ लाभार्थींच्या बँक खात्यावर रु.५५३.८६ लक्ष एवढी अनुदानाची रक्कम जमा करण्यात आली आहे. उर्वरित लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर अनुदान जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

पूर्वसंमती दिलेल्या ज्या शेतकऱ्यांनी सूक्ष्म सिंचन संचाची उभारणी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केलेत, असेच शेतकरी अनुदानासाठी पात्र आहेत. पूर्वसंमती नसलेल्या व परस्पर सूक्ष्म सिंचन संच बसविलेल्या शेतकऱ्यांना अनुदान अनुज्ञेय नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईसह राज्यातील पुणे, नागपूर येथे होणाऱ्या अवैध गावठी दारुविक्रीला आळा घालण्याबाबत**

**(२८) ४७१०१ (२८-०४-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील पुणे, नागपूर येथे मोठया प्रमाणत पोलीस व स्थानिक प्रशासनाला दुर्लक्षित करुन गावठी दारुची विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे होणाऱ्या अवैध गावठी दारुविक्रीला आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-१०-२०१६)** :(१) हे अंशत: खरे आहे.

(२) अवैध मद्य निर्मिती व विक्री ठिकाणावर पोलीस विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कारवाई करण्यासाठी संयुक्त पथके निर्माण करण्यात आली आहे. मुंबई (शहर व उपनगर), पुणे व नागपूर या ठिकाणी प्रतिबंधात्मक कार्यवाही अंतर्गत १६७ गुन्ह्यांसह एकूण २९९८ गुन्हे दाखल केले आहेत आणि रु.४.५६ कोटीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून विभागीय स्तरावर निरीक्षक/दुय्यम निरीक्षक यांची विशेष पथके तयार करुन मोहिम राबविली जातात. तसेच पोलीस विभागाशी संपर्क साधून समन्वयाने व संयुक्तपणे मोहिमा राबविल्या जातात. त्यामुळे अशा अवैध गावठी दारु धंद्यावर नियंत्रण ठेवण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रेणापूर तालुक्यातील शेतकरी पात्र असतानाही दुष्काळ अनुदानापासून वंचित राहिल्याबाबत**

**(२९) ४७४९४ (२८-०४-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नरवटवाडी व पानगाव (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील शेतकरी सन २०१५ च्या शासनाच्या दुष्काळ अनुदान यादीत नावे समाविष्ट नसल्यामुळे पात्र असतानाही सदर प्रकरणी चौकशी करून अनुदानापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांची नावे अनुदान यादीत समाविष्ट करण्याबाबात व सदर वंचित शेतक-यांना अनुदान वाटपाबाबत स्थानिक लोकप्रतीनिधिनी दिनांक १६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास उपविभागीय अधिकारी, रेणापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती अनुदानापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांची नावे अनुदान यादीत समाविष्ट करण्याबाबात तसेच शेतक-यांना अनुदान वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटीले (१९-०८-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली असून, पानगांव येथील तलाठी यांचेवर कार्यवाही करुन त्यांची वेतनवाढ रोखण्यात आली आहे.

(३) अनुदानापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांची यादी प्रसिध्द करण्यात आली असून, अनुदान वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अल्पसंख्याक विकास कार्यक्रमांतर्गत बुलढाणा जिल्हयाचा समावेश करण्याबाबत**

**(३०) ४७७७३ (२८-०४-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा हा अल्पसंख्यांक लक्ष गटात असल्याचे केंद्र शासनाने सन २०१३ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पसंख्यांक विकास कार्यक्रमा अंतर्गत बुलढाणा जिल्हयाचा समावेश आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, अल्प संख्यांकांच्या बहुक्षेत्र विकास कार्यक्रमाअंतर्गत मोताळा तालुक्याचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रस्तावा बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-०८-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दि. २७/०५/२०१६ च्या पत्रान्वये बुलढाणा जिल्ह्यातील अल्पसंख्याक गाव समूह निश्चितीचा अहवाल मान्यतेसाठी पाठविला आहे, हे खरे आहे.

(४) जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचा दि २७/०५/२०१६ रोजीचा अहवाल तपासण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर तालुक्यात (जि.ठाणे) येथे सतत चार वर्षे वादळी पावसाने आदिवासी व इतर जनतेच्या घरांचे झालेल्या नुकसानीबाबत**

**(३१) ४७८०४ (२८-०४-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर तालुक्यात (जि.ठाणे) सतत चार वर्षे वादळी पावसाने अनेक आदिवासी व इतर जनतेच्या घरांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने पंचनामे होवून सुध्दा त्यांना शासनामार्फत कोणतीच नुकसान भरपाई अद्याप देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

मागील चार वर्षात वादळी पावसाने नुकसान झालेल्या घरांसाठी शासन निर्णयाप्रमाणे मदत देण्यात आलेली आहे. तसेच सन २०१४-१५ मध्ये नुकसान झालेल्या ७३४ घरांसाठी मदत देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील अकोले बसस्थानकाच्या प्रवेशद्वारावर फळविक्रेत्यांनी केलेले अतिक्रमण हटविणेबाबत**

**(३२) ४७९७९ (२८-०४-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील अकोले बसस्थानक प्रवेशद्वारावर फळ विक्रेत्यांनी अतिक्रमण केल्याने मोठ्या प्रमाणात अपघात होवूनही आगार प्रमुखांनी कोणतीही कार्यवाही केली नसल्याने वाहकांना बसेसची ने आण करताना त्रास होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्थानकाची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीअंती अकोले बसस्थानकाच्या प्रवेशद्वारावर अतिक्रमण करुन करीत असलेला फळ विक्रीचा धंदा हटविणेबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२९-०९-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

अकोले बसस्थानक बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर १९८४-८५ मध्ये बांधण्यात आलेले असून सदर बसस्थानकाच्या बाहेरील बाजूस विकासकाद्वारे बांधण्यात आलेल्या गाळ्यासमोर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले.
(२) व (३) अकोले बसस्थानकाच्या प्रवेशद्वारावरील अतिक्रमण धारकांना दिलेल्या सूचनेनुसार संबंधित फळविक्रेत्यांनी अतिक्रमण काढून घेतले आहे.

तसेच संबंधित अतिक्रमणा विरुध्द पोलीस स्टेशन, अकोले व सार्वजनिक बांधकाम विभागास राज्य परिवहन महामंडळाद्वारा तक्रारी दाखल केल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात खरीप हंगामात दुष्काळी परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(३३) ४८२८७ (२७-०४-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खरीप हंगामात दुष्काळी परिस्थितीमुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले असेल तर त्या शेतकऱ्यांना मदत देणार असल्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ९ जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नुकसान भरपाईकरिता कोणते निकष लावण्यात आले आहेत,
(३) असल्यास, या घोषणेनुसार शासनाने अंमलबजावणी केली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१६) :**(१) होय, अंशत: खरे आहे.
(२) व (३) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक एससीवाय-२०१६/प्र.क्र.१/म-७ दि.०२ मार्च, २०१६ अन्वये औरंगाबाद, अमरावती, नागपूर व नाशिक विभागातील कापूस पीकांसाठी पीक वमा योजनेची मंडळ निहाय मदत जाहीर झाल्यानंतर विमा काढलेल्या सर्व शेतकऱ्यांना विमा योजनेच्या निकषानुसार मदत देण्यात येईल. ज्या शेतकऱ्यांनी विमा उतरवलेला नाही, अशा शेतकऱ्यांना पीक विमा योजनेची मंडळ निहाय जाहीर केलेल्या रकमेच्या ५०% रक्कम शासनाकडून देण्यात येईल, असे आदेश निर्गमित केले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे ताडकळस (ता.पूर्ण, जि.परभणी) येथे कृषि विभागाचे वतीने सुरु करण्यात आलेली एक खिडकी योजना**

**(३४) ४८४१३ (२८-०४-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ताडकळस (ता.पूर्ण, जि.परभणी) येथे कृषि विभागाचेवतीने महसूल विभागाच्या ठिकाणी एक खिडकी योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर ठिकाणी सुरु करण्यात आलेले काम एक वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सदर एक खिडकी योजनेमार्फत कामे करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१७-०८-२०१६) :**(१) एक खिडकी योजना महसूल राज्याच्या ठिकाणी नसून प्रत्येक महसूल विभागाच्या ठिकाणी सुरु करण्यात आलेली आहे, हे खरे आहे.

(२) नाही, एक खिडकी योजना अंतर्गत महाराष्ट्र शासन कृषि विभागाच्या मार्गदर्शक सूचना प्रमाणे योजना राबविण्यात येतात व त्याप्रमाणे कामे सुरु आहेत.

(३) चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आजरा (जि.कोल्हापूर) येथे म्हशीच्या गोठयाला आग लागून झालेले नुकसान**

**(३५) ४८६७९ (२८-०४-२०१६). श्री.प्रकाश अबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजरा (जि.कोल्हापूर) येथे म्हशीच्या गोठयाला आग लागून अंदाजे १२ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची घटना दिनांक १३ जानेवारी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकरी सिलेमान इब्राहिम सोलेसन यांनी तहसिलदार आजरा यांचेकडे नुकसान भरपाईची मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती नुकसानग्रस्त शेतकऱ्याला मदत मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१०-२०१६)** :(१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) होय.

सन घटनेतील बाधिताना दिनांक १३ मे, २०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येकी रु.३०,०००/- याप्रमाणे तीन जनावरांसाठी रु.९०,०००/- इतकी रक्कम देय आहे. त्यापैकी रु.२७,०००/- इतकी मदत देण्यात आली असून उर्वरित मदत देण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांचेमार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्राचा दुष्काळ निधी महाराष्ट्राला अदयापही मिळाला नसल्याबाबत**

**(३६) ४९०४२ (०४-०५-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने दुष्काळासाठी ३ हजार ५०० कोटीचा निधी तर राज्य शासनाने २ हजार ५०० कोटीचा निधी दिला असा सुमारे १४.३४ कोटी रुपयांचे वितरण झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) तसेच, चौकशीअंती दुष्काळासाठी केंद्र व राज्य शासनाने दिलेल्या निधीचे पूर्ण क्षमतेने वाटप व्हावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०८-२०१६)** :(१) हे खरे नाही.

खरीप-२०१५ करिता बाधित शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याकरिता एकूण आवाश्यक निधी रु. ३५७८.४३ कोटी इतका असून, त्यापैकी रु. ३१११.१३ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील दुष्काळ निवारणाची कामे पूर्णत्वास नेण्यासाठी उर्वरित निधी देण्याबाबत**

**(३७) ४९१७१ (२८-०४-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील दुष्काळाची स्थिती पाहता जिल्हा प्रशासनाने ६५५ कोटी रुपयांच्या दुष्काळ निवारण निधीची मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे आतांनाही शासनाने ३०२ कोटीचा निधी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निधीतून जिल्हयातील दुष्काळ निवारणाची कामे पूर्णत्वास नेणे शक्य होणार नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती दुष्काळ निवारणाची कामे पूर्णत्वास नेण्यासाठी उर्वरित निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०८-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

खरीप - २०१५ करिता रु. ३३१.१२ कोटी अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील पाच लाख लोकसंख्या असलेल्या सिडकोसाठी**
**स्वतंत्र्य एस.टी. बसस्थानक बांधण्याबाबत**

**(३८) ४९१७६ (२८-०४-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील पाच लाख लोकसंख्या असलेल्या सिडकोसाठी स्वतंत्र्य एस.टी. बसस्थानक बांधण्यात यावे अशी मागणी संबंधित अधिकारी यांच्याकडे स्थानिकांनी व लोकप्रतिनिधींनी वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी एस.टी. बसस्थानक बांधण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१२-०८-२०१६) :**(१) होय.

(२) सिडको परिसरात राज्य परिवहन महामंडळाच्या मालकीची जागा नाही. सिडको प्रशासनाने शहर विकास आराखड्यात स्वतंत्र बसस्थानकासाठी जागा आरक्षित नसल्याबाबत राज्य परिवहन महामंडळास कळविले आहे. त्यामुळे सिडको परिसरात नविन बस्थानकासाठी राज्य परिवहन महामंडळास निर्णय घेता आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोंढा-कोसरा (ता.पवनी) अनेक गावांतील शेतकऱ्यांचे धान पिकाचे पावसामुळे झालेले नुकसान**

**(३९) ४९४१६ (२८-०४-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढा-कोसरा (ता.पवनी) अनेक गावांतील शेतकऱ्यांच्या शेकडो शेतीमधील धान पिकाचे पावसामुळे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात कोढा येथील तलाठ्यांना शेतीची पाहणी करुन पंचनामा तयार करण्यासाठी बोलावले असता तलाठी पंचनामा करण्यास दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन परिसरातील शेतकऱ्यांची कर्ज माफी करुन कोरडा दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०९-२०१६) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील ८ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्याबाबत**

**(४०) ५००१४ (२८-०४-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील एकूण १६ पैकी आठ तालुक्यातील पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आल्याने ते दुष्काळाच्या यादीत आले असून उर्वरित ८ तालुक्यांची पैसेवारीसुध्दा ५० पैशांच्या आत येण्याचे संकेत महसूल विभागाकडून मिळाल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ८ तालुक्यांतही दुष्काळ जाहीर होणार असून तसे झाल्यास जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दुष्काळाच्या सोयी-सुविधा व सवलतींचा लाभ मिळणार आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार या ८ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना दुष्काळाच्या सोयी-सुविधा व सवलतींचा लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-२०१५/प्र.क्र.३११/म-७ दिनांक २०/१०/२०१५ अन्वये दुष्काळग्रस्त भागात विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्य एस.टी. महामंडळात गेल्या अनेक वर्षापासून वरिष्ठ अधिकाऱ्यापासून ते चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यापर्यंत १२ हजार पदे रिक्त असल्याबाबत

**(४१) ५०५६५ (२८-०४-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य एस.टी. महामंडळात गेल्या अनेक वर्षापासून वरिष्ठ अधिकाऱ्यापासून ते चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यापर्यंत १२ हजार पदे रिक्त असल्याचे दिनांक ८ फेब्रुवारी, २०१६ व त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एस.टी. महामंडळात अनेक पदे रिक्त असल्याने त्याचा एस.टी.च्या कार्यक्षमतेवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे,
(३) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्याबाबत तसेच एस.टी. ची कार्यक्षमता वाढवून एस.टी. नफ्यात चालण्यासाठी प्रवाश्यांना खाजगी बसेस प्रमाणे सुखसुविधा पुरविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१२-०९-२०१६)** :(१), (२) व (३) रा.प.महामंडळातंर्गत १, २५, ३८३ एवढी मंजूर पदे असून १,०६,१११ एवढी भरलेली तर १९२७२ रिक्त पदे आहेत. यापैकी सरळसेवेंतर्गत १२,४२६ एवढी पदे रिक्त आहेत.

उपरोक्त विविध संवर्गातील रिक्त पदे सरळ सेवेने व खाते बढती समितीमार्फत टप्प्या-टप्प्याने भरण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे

राज्य परिवहन महामंडळाचे भारमान, उत्पन्नामध्ये वाढ व खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने प्रवासी वाढवा योजना, नैमित्तीक करारावर देण्यात येणाऱ्या बसेसच्या अटींमध्ये बदल, सक्षम मार्ग तपासणी व खाजगी वाहतुकीद्‌वारे उत्पन्न गळती रोखणे, प्रवासी आकर्षित करण्यासाठी प्रवास भाड्यात सवलत योजना, वार्षिक सवलत कार्ड मासिक/त्रैमासिक कार्ड योजनांना व्यापक प्रसिध्दी देणे, प्रवाशांना ई-तिकिट प्रणालीद्‌वारे तिकिट आरक्षण सुविधा, स्मार्ट कार्ड, मोबाईल ॲप सुविधा इ. उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे रा.प.बसेसवर जीपीएस, व्हीटीएस, सीसीटीव्ही, वायफाय, पेसेंजर्स इनफॉर्ममेशन सिस्टीम इ. सुविधा उपलब्ध करुन देण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कापूस व सोयाबिन या नगदी पिकांना शेतक-यांनी विमा संरक्षण घेतले नसल्यास आपत्ती समजून मदत जाहीर करण्याच्या धोरणाबबत**

**(४२) ५०८५५ (२८-०४-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने कापूस व सोयाबिन या नगदी पिकांना शेतक-यांनी विमा संरक्षण घेतले नसल्यास आपत्ती समजून मदत करण्याचे धोरण जाहीर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगदी पिकांना अशा प्रकारे मदत देवून अन्य पिक घेणाऱ्या शेतक-यांवर अन्याय होऊ नये याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१६) :**(१) होय.

(२) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक एससीवाय-२०१६/प्र.क्र.१/म-७, दि.२ मार्च, २०१६ अन्वये खरीप २०१५ मधील औरंगाबाद, नाशिक, अमरावती व नागपूर विभागातील कापूस, अमरावती व नागपूर विभागातील सोयाबीन व नागपूर विभागातील धान पीकांच्या नुकसानीसंदर्भात विशेष मदत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा जिल्हयात दुष्काळी गावांत शासनाच्या दुष्काळी मदतीच्या योजना लागू करण्याबाबत**

**(४३) ५१०१३ (२८-०४-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयात टंचाईग्रस्त गावांची संख्या ४५९ आहे. तर ५० पेक्षा कमी पैसेवारी असतानाही ३४३ गावे आहे. टंचाईग्रस्त गावांच्या आकडेवारीत मान, खटाव, फलटण पाठण, वाई, उत्तर कोरेगावातील गांवाची संख्या मोठी आहे. तर कमी पैसेवारी असलेल्या गांवामध्ये यांच्यासह इतर तालुकेही असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीअंती सदर तालुक्यातील दुष्काळी गावांत शासनाच्या दुष्काळी मदतीच्या योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) शासन निर्णय क्र. एससीवाय:-२०१५/प्र.क्र.३११/म-७ दि. २० ऑक्टोबर, २०१५ अन्वये सन २०१५-१६ च्या खरीप हंगामात ज्या गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आहे अशी गावे दुष्काळग्रस्त जाहिर करुन विविध उपाययोजना लागू करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील ताकारी, टेंभू व म्हैसाळ या सिंचन योजनांचे टंचाईच्या काळातील आवर्तनाचे वीजबील आणि पाणीपट्टी टंचाई निधीतून भरण्याबाबत**

**(४४) ५१३९१ (२८-०४-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती पहाता ताकारी, टेंभू व म्हैसाळ या सिंचन योजनांचे टंचाईच्या काळातील आवर्तनाचे वीजबिल आणि पाणीपट्टी शासनाने टंचाई निधीतून भरावे अशी मागणी कवठे महाकाळ पंचायत समितीचा ठराव माहे डिसेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान संमत केला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच अशीच मागणी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे/जिल्हा परिषदेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय:-२०१५/प्र.क्र.३११/म-७ दि. २०/१०/२०१५ अन्वये विद्‌युत देयकात ३३.५०% सुट दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्ह्यातील ७३७ गावातील शेतकऱ्यांचे नापेर क्षेत्राबाबत चुकीचा अहवाल दिल्याबाबत**

**(४५) ५१७८९ (२१-०४-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील ७३७ गावातील शेतकऱ्यांचे नापेर क्षेत्राबाबत दिलेला चुकीचा अहवाल दुरुस्त करुन सुधारीत अनुदान मिळण्याबाबत अनेक शेतकऱ्यांनी/सामाजिक कार्यकर्त्यानी जिल्हा प्रशासनाकडे लेखी अर्जाद्‌वारे तक्रार केलेली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुष्काळग्रस्त शेतकऱ्याचे पेरणीचे क्षेत्र कमी दाखविल्याने त्यांना शासनाने जाहीर केल्यानुसार अनुदान मिळत नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने चुकीचा अहवाल देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६)** :(१) अंशतः खरे आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील लोहारा तालुक्यातील काही शेतकरी / सामाजिक कार्यकर्त्यांनी इतर तालुक्याप्रमाणे १००% अनुदान वाटप करावे असे निवेदन जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना दिले होते परंतु नापेर क्षेत्राबाबत चुकीचा अहवाल दुरुस्त करुन सुधारित अनुदान मिळण्याबाबत निवेदन प्राप्त झालेले नाही.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात विशेषतः गडचिरोली जिल्हयात धानाला प्रती क्विंटल ३००० रुपये हमीभाव जाहीर करणेबाबत**

**(४६) ५१९१८ (२८-०४-२०१६). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात व विशेषतः गडचिरोली जिल्हयात यावर्षी पावसाचे प्रमाण अत्यल्प झाल्याने शेतीच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कमी उत्पन्न व धानाचे हमी भाव कमी असल्याने शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आल्याने शेतकऱ्यांचे आत्महत्यांचे प्रमाण वाढले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त घटना थांबविण्यासाठी शेतक-यांना धानाचे हमी भाव ३००० रुपयापर्यंत वाढविणे आवश्यक आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती या वर्षी धानाला हमी भाव वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२२-०९-२०१६)** :(१) गडचिरोली जिल्हयात खरीप हंगाम २०१५ मध्ये सरासरी पर्जन्यमानाचे तुलनेत ७१ टक्के तर राज्यात सरासरी पर्जन्यमानाच्या तुलनेत ५९ टक्के जाऊस पडला होता. त्या हंगामात पावसाचे प्रमाण घटल्याने अन्नधान्याचे उत्पादनात ३७ टक्के घट झाली होती.
(२), (३), (४), (५) व (६) शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची कारणे अनेक प्रकारची आहेत. त्यामध्ये नापिकी व कर्जबाजारीपणा सुद्धा समाविष्ट आहेत.

खरीप धान पीकासाठी राज्य शासनाने २०१४-१५ व २०१५-१६ करिता अनुक्रमे रु.२७७०/- आणि रु. २९५४/- प्रति क्विंटल आधारभूत किंमत केंद्रीय कृषि मुल्य व किंमत आयोगाकडे प्रस्तावित केली हाती, तथापि केंद्र शासनाने २०१४-१५ व २०१५-१६ करिता अनुक्रमे रु.१३६०/- आणि रु.१४१०/- प्रति क्विंटल आधारभूत किंमत जाहिर केलेली आहे.

किमान आधारभूत किंमती जाहीर करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. शेतमालाला वाजवी हमी भाव मिळावेत म्हणून राज्य शासन केंद्र शासनाकडे नेहमीच आग्रही भूमिका घेत असते.

---

**सातारा जिल्हयातील धोम, कन्हेर, कोयना प्रकल्पग्रस्तांचे कार्याध्यक्ष यांनी केलेल्या मागण्या**

**(४७) ५१९६३ (२८-०४-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील धोम, कन्हेर, कोयना प्रकल्पग्रस्तांचे कार्याध्यक्ष यांनी आपल्या मागणीचे निवेदन दिनांक ६ डिसेंबर, २०१५ रोजी मा.मदत व पुनर्वसन कार्य मंत्री तसेच विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागण्यांचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०८-२०१६) :**(१) होय, मा.मंत्री (म.व. पु.) महोदयांच्या कार्यालयाकडून सदरचे निवेदन जिल्हाधिकारी, सातारा यांना पाठविण्यात आलेले आहे.

(२) धोम कण्हेर पुनर्वसित खातेदारांच्या जमिनींचे सपाटीकरण कर्ज माफ करणे, पुनर्वसित गावांमध्ये पोलिस पाटील पदे भरणे, ज्या खातेदारांना अंशत: पर्यायी जमीन देणे बकी आहे त्यांना सोलापूर ऐवजी सातारा जिल्ह्यात जमीन देणे, बुडीतातील जमिनीवरील शर्त २ ची जमीन विक्रीबाबतची नजराणा भरण्याची अट बदलणे, पुनर्वसित गावांमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी निधीची तरतूद करणे, पुनर्वसन प्राधिकरणावर श्री.भारत पाटणकर यांचेऐवजी अन्य धरणग्रस्त तज्ञ व्यक्तीची नियुक्ती करणे, ज्या प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीला सिंचनासाठी पाणी मिळत नाही त्यांना दरमहा निर्वाह भत्ता मिळणे, वयोमर्यादा उलटून गेल्यामुळे नोकरीसाठी अपात्र असलेल्या प्रकल्पग्रस्तांना एकरकमी अर्थसहाय्य मंजूर करणे, इत्यादी मागण्या सदर निवेदनामध्ये करण्यात आल्या आहेत.

(३) पोलिस पाटलांची पदे भरणे, पर्यायी जमिनीचे वाटप करणे, इ. क्षेत्रीय स्तरावरील मागण्यांबाबत जिल्हा स्तरावर कार्यवाही प्रगतीपाथावर आहे.

जमीन सपाटीकरणाच्या कर्जाची माफी तसेच प्रकल्पग्रस्तांस वाटप जमिनीचे भोगवटादार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करताना कब्जेहक्काची रक्कम माफ करणे याबाबत प्रचलित धोरण तरतूद नाही.

धोम कण्हेर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसित गावठाणांत देय नागरी सुविधांसाठी मागणीनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

नव्याने गठित केलेल्या राज्य पुनर्वसन प्राधिकरणावर अशासकीय सदस्य म्हणून श्री.भारत पाटणकर कार्यरत नाहीत.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव जागांवर प्रकल्पग्रस्तांच्या नेमणूका स्पर्धा परीक्षेद्वारे व गुणवत्तेनुसार करण्यात येतात. तसेच प्रकल्पग्रस्त दाखले हस्तांतरीत करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजा महागाव येथील पुनर्वसन प्रकल्पात नागरी सुविधा देण्याबाबत

**(४८) ५३०६९ (२८-०४-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा महागाव (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) येथील पुनर्वसन प्रकल्पात नागरी सुविधा गेल्या १७ वर्षापासून मिळाले नसल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी करुन विधानसभेत याबाबत अनेकवेळा मागणी करुनही अद्याप याबाबत कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजा महागाव येथील पुनर्वसन प्रकल्पात नागरी सुविधा देण्यासाठी शासनाने कोणती तातडीची कार्यवाही करण्यात आली आहे वा यत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) मौजा महागाव येथील पुरग्रस्त पुनर्वसन गावामध्ये रस्ते, कच्या नाल्या, पाण्याची टाकी, विद्युत पुरवठा या नागरी सुविधा देण्यात आलेल्या आहेत. तसेच उर्वरित देय नागरी सुविधांच्या अंदाजपत्रकास शा.नि. दि.१३.०४.२०१६ अन्वये प्रशासकिय मान्यता देण्यात आली असून त्याकरीता आवश्यक निधीची तरतूद पुरवणी मागणीद्वारे करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंगणघाट (जि.वर्धा) येथील नागरिकांचे पुनर्वसन करुन घरकुल देण्याबाबत

**(४९) ५३०८२ (२८-०४-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) येथील नदी व नाल्याच्या काठावर राहणाऱ्या नागरिकांचे योग्य ठिकाणी पुनर्वसन करुन घरकुल देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीवरुन मा.वित्त व नियोजन मंत्री, यांनी जिल्हाधिकरी, वर्धा यांना दिनांक १९ जुलै, २०१५ रोजी योग्य कार्यवाही करण्याचे निदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याअनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती हिंगणघाट (जि.वर्धा) येथील नागरिकांचे पुनर्वसन करुन घरकुल देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, याबाबत उपविभागीय अधिकारी, हिंगणघाट यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे.
(३) हिंगणघाट (जि.वर्धा) येथे सन १९७९ मध्ये वणा नदीला आलेल्या पुरामध्ये बाधीत झालेल्या व्यक्तींचे पुनर्वसन मौजा पिंपळगाव व मौजा नांदगाव (बो) येथे करण्यात असलेले आहे. मौजा पिंपळगाव येथे एकूण ११४२ भूखंड टाकण्यात आले आहे. त्यापैकी ६६७ भूखंडाचे पूरग्रस्तांना वाटप करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे मौजा नांदगाव (बो) येथे ८०६ भुखंड टाकण्यात आले असून ते पुर्ण भुखंड पुरग्रस्तांना वाटप करुन त्याठिकाणी पुरग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील बारामती-फलटन रस्ता व फलटन-लोणंद-शिरवाळ रस्त्याच्या कामाबाबत**

**(५०) ६०३५७ (२४-०८-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील बारामती-फलटन रस्ता व फलटन-लोणंद-शिरवाळ रस्त्याच्या कामाची प्रगती व सद्यस्थिती काय आहे,
(२) तसेच या रस्त्यांच्या कामांना कैंव्हा मंजूरी देण्यात आली व हे काम कैंव्हा पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले होते,
(३) तसेच सदर रस्त्यांची कामे संथ गतीने सुरु असल्यास त्याची कारणे काय आहेत,
(४) या रस्त्याची कामे त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-११-२०१६) :**(१) सद्य:स्थितीत एकूण ७७.९० कि.मी. लांबी पैकी ४८ किमी पूर्ण, १० कि.मी. चे काम प्रगतीत असून १९.९० किमी लांबीतील काम भूसंपादनाअभावी सुरु नाही.

(२) रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या प्रकल्पास मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या दि.२६.१२.२००७ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या निविदेस मंत्रिमंडळ पायाभूत सुविधास समितीने मंजूरी दिली आहे. तसेच सदर रस्त्याचे काम मार्च, २०१३ पर्यंत करण्याचे ठरविण्यात आले होते.

(३) भूसंपादन कायद्यातील बदल व न्यायालयीन प्रकरणांमुळे भूसंपादनाची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण झाली नसल्याने काम रेंगाळले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.